13 - 14

mm

(28)

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (म.), मुंबई यास सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाकरिता भागभांडवली अंशदान मंजूर करण्याबाबत..

# महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय, क्रमांक:-संकिर्ण-२०१३/प्र.क्र.१७५(२)/महामंडळे
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ११ फेब्रुवारी, २०१४.

वाचा :- i) शासन परिपत्रक,वित्त विभाग, क्र.: बीजीटी-२०.११/ प्र.क्र.४३/२०११/अर्थसंकल्प-३, दि. २८/०४/२०१३.
ii) शासन ज्ञापन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग. क्र.:-बीजीटी-२०१३/प्र.क्र.६३/अर्थसंकल्प, दि.१६/०४/२०१३
iii) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.संकिर्ण-२०१३/प्र.क्र.१७५/महामंडळे, दि. ०७/०४/२०१३.
iv)शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.: अंदाज-२०१३/ प्र.क्र.८५/अर्थसंकल्प-३, दि. १३/०१/२०१४.

**शासन निर्णय :-** लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्या.मुंबई या शासन अंगीकृत उपक्रमाची स्थापना दि.११ जुलै,१९८५ रोजी कंपनी अधिनियम, १९५६ अनुसार करण्यात आली आहे. या महामंडळामार्फत अनुसूचित जातीतील मातंग समाजाच्या व्यक्तींची आर्थिक उन्नती करण्यासाठी विविध योजना राबविण्यात येतात. या महामंडळास या महामंडळाला भागभांडवलासाठी सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाकरीता रु.७५०००० हजार (अक्षरी रुपये पंच्याहत्तर कोटी फक्त ) एवढी तरतूद अर्थसंकल्पीत आहे. सदर तरतूदीपैकी रु.१२५००० हजार इतकी तरतूद संदर्भाधीन ३ येथील शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आली आहे

आता संदर्भाधीन क्र. ४ येथील वित्त विभागाच्या परिपत्रकानुसार मूळ तरतूदीच्या ८० % तरतूद वितरीत करण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार महामंडळास यापूर्वी वितरीत केलेली तरतूद रु.१२५००० हजार वजा जाता उर्वरीत निधीरु. ४७५००० हजार (अक्षरी रुपये सत्तेचाळीस कोटी पन्नास लाख फक्त) एवढी तरतूद वितरीत करण्यास शासन खालील अटी व शर्तीवर मान्यता देत आहे :-

i) महामंडळाने लाभार्थ्यांना अर्थसहाय्य मंजूर करण्याचे धोरण अशा प्रकारे निश्चित करावे जेणेकरुन भविष्यात लाभार्थ्यांकडून वसुलीच्या थकबाकीत वाढ होणार नाही.
ii) महामंडळाचे वार्षिक लेखे विधीमंडळास सादर करणे ही संविधानिक जबाबदारी आहे. त्यासाठी अपूरा कर्मचारी वर्ग हे कारण न देता महामंडळाचे वार्षिक लेखे विधीमंडळास ६ महिन्याच्या आंत सादर करण्याची कार्यवाही करावी.
iii) महामंडळाने वसूलीबाबत विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. कारण या वसूलीमधूनच नवीन लाभार्थ्यांना निधी उपलब्ध करुन घेता येईल. तसेच राष्ट्रीय उपक्रमांचे कर्ज देखील फेडता येईल. तरी महामंडळाच्या वसूलीचे अत्यल्प असलेले प्रमाण वाढविण्यासाठी ठोस उपाययोजना करुन त्याप्रमाणे प्रयत्न करावेत.
iv) थकबाकीच्या रकमा कालबध्द पध्दतीने वसुल करण्याबाबतची उपाययोजना/धोरण सुचविण्यात यावे.
v) महामंडळ राबवित असलेल्या योजनांची माहिती ( यावर्षी निश्चित केलेली उद्दीष्टे व साध्य झालेले लक्ष्य ) शासनाकडे सादर करावी.
vi) योजनेतर निधीतील खर्चासाठी शासनाने ठरविलेले निर्बंध काटेकोरपणे अंमलात आणावेत.
vii) कर्ज वसुलीमध्ये समाधानकारक प्रगती नसल्यास पुढील वर्षी भागभांडवल अशंदान वितरीत करण्यात येणार नाही याची महामंडळाने नोद घ्यावी.

कृ.मा.प..

viii) महामंडळाने ऑन लाईन (On Line) संगणक प्रणाली विकसीत करुन त्याची अंमलबजावणी करावी.

ix) वरील भागभांडवलातून जिल्हानिहाय निवासी उप जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली समितीमार्फत लॉटरी पध्दतीने कर्जाचे वाटप करावे.

x) सन २०१२-१३ व सन २०१३-१४ या वर्षात कर्ज वाटप केलेल्या /करण्यात येणाऱ्या लाभार्थ्यांची नावे व जेष्ठता यादी त्यांच्या दिनांकासह व अर्जाच्या दिनांकासह महामंडळाच्या नोटीस बोर्ड व वेबसाईटवर तसेच, जिल्हाधिकाऱ्यांच्या नोटीस बोर्डवर टाकावी.

२. प्रस्तुत शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेली रक्कम अदा करण्यासाठी प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण , कोकण विभाग, नवी मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण,नवी मुंबई यांनी सदरहू रक्कम म.को.नि.४४ मधील नमुन्यातील देयकान्वये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्यादित), मुंबई यांना अदा करावी. तसेच सदर देयकावर प्रतिस्वाक्षरी करण्याचे अधिकारही त्यांना किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-यांस देण्यात येत आहेत.

३. या बाबींवर होणारा खर्च पुढीलप्रमाणे नमूद केलेल्या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकावा व तो चालू आर्थिक वर्षाच्या मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा:-

४२२५-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांच्या कल्याणावरील भांडवली खर्च,

०१, मागासवर्गाचे कल्याण

१९० - सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणूका,
पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, राज्य योजनांतर्गत योजना

(०१)(०१) लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळास भागभांडवली
अंशदान (४२२५ ००२ २) (वि.घ.यो.)

५४ गुंतवणूका

**मागणी क्रमांक एन-४**

४. हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या सहमतीने (अनौ.सं.क्र.५२/ व्यय-१४, दि.५/२/२०१४) निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(प्र.पां.लुबाळ)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण, कोकण विभाग, नवी मुंबई (दोन प्रती)
व्यवस्थापकीय संचालक, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ(मर्या.) मुंबई
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा) महाराष्ट्र १ , मुंबई.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
अप्पर कोषागार अधिकारी, कोकणभवन, नवी मुंबई.
नियोजन विभाग (का.१४३१) मंत्रालय,मुंबई
वित्त विभाग, (का साउ/अर्थोपाय), मंत्रालय, मुंबई.
कक्ष अधिकारी, (अर्थसंकल्प/विघयो), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
निवड नस्ती का-महामंडळे